(193)

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : ६९४०३३३३ ई.मेल : collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in

---

तक्रार क्र. १९३

क्र.: सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-४६९/२०२२
दिनांक :०६/०६/२०२३ 7807

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ,
बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**विषय :** मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१५८३ साई दर्या ढाबाच्या मागे, मार्वे रोड, मालवणी याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत...

उप वन संरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 147
दिनांक 13/06/2023
मुख्य लेखापाल ... वन संरक्षक

**संदर्भ :** १. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष यांचेकडील पत्र दि.०१/०८/२०२२ व १६/१२/२०२२.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-८२६/१८/२०२२/२३ दि. १५/०५/२०२३.

AR A.O. Anita Patil 14/06/23

Mangrove comm.

उपरोक्त विषयांकित आपलेकडील संदर्भिय क्र. १ च्या पत्रासोबत अर्जदार श्री. योगेश केणी यांचा मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१५८३ साई दर्या ढाबाच्या मागे, मार्वे रोड, मालवणी याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार चौकशी करुन उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र. २ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

प्रकरणी मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१५८३ साई दर्या ढाबाच्या मागे, मार्वे रोड, मालवणी याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी दि.०६/०१/२०२३ अन्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच सदर जागेवर सन २००५ व सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. सदरचे क्षेत्र हे अधिसूचित राखीव कांदळवनापासून ५० मी.च्या बाहेर येत आहे.

तसेच सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार श्री. धनेश कोळ यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे भारतीय दंड संहिता १९६० मधील कलम ४४१, ४४७ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२० अन्वये गु.र.क्र.१२७३/२०२१ दि. २५/०९/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे सदर जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासीत करणेबाबत प्र.उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांना तहसिलदार बोरीवली यांनी दि.०८/०६/२०२२ व ०२/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

प्रकरणी तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नसून सदर जागेवर सन २००५ व सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनापासून ५०मी.च्या बाहेर येत असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे योग्य होईल, असे मत नमुद केलेले आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

(सतिश बागल)
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

**स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.**

D:\Backup 2I\01.01.2022\Mangroves Complaint\बोरीवली\469 श्री. योगेश केणी DCF Ref..docx

ज/२४० ⑥

जमा/२३/ १८२४०

अ. चि. २आय

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६५१०१३६
ईमेल- sdomsdest@gmail.com

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि- ८२६/१८/२०२२/२३
दिनांक : १५/०५/२०२३

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी,
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
19 MAY 2023

**विषय :** मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १५८३ साई दर्या ढाबाच्या मार्ग, मार्वे रोड, मालवणी याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत...

**संदर्भ :** १.आपल्याकडील पत्र क्र.सी/कार्या-२आय/ कावि-४६९/२०२२,दि.१७/०८/२०२२
२. तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र.तह/बोरी/टे-२/कावि-११६३/२०२१, दि. २३/०२/२०२३

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्याकडील संदर्भीय पत्र क्र.१ सोबत प्राप्त झालेला श्री. योगेश केणी यांचा तक्रार अर्ज चौकशी करून अहवाल सादर करणेकामी तहसीलदार बोरीवली यांचेकडे पाठविला असता, तहसीलदार बोरीवली यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई तथा सचिव तालुका स्तरीय कांदळवन संरक्षण समिती यांचेमार्फत चौकशी करून संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

मौजे मालवणी, ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १५८३ साई दर्या ढाबाच्या मागे, मार्वे रोड, मालवणी याठिकाणी कांदळवनांचा ऱ्हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी पत्र क्र. क्र. अ. पश्चिम मुंबई / १४०९/२०२२-२३, दि. ०६/०१/२०२३ अन्वये अहवाल सादर केला आहे की, तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच सदर जागेवर सन २००५ व सद्य:स्थितीत कांदळवन दिसून येत नाही. सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनापासून ५० मी. च्या बाहेर येत आहे. तसेच सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार श्री.धनेश कोळी यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२७३/२०२१, दि.२५/०९/२०२१ अन्वये भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४४१, ४४७ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सोबत F.I.R. ची प्रत जोडली आहे.

त्याचप्रमाणे सदर जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासीत करणेबाबत प्रभारी उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का) मालाड यांना तहसीलदार बोरीवली यांनी दि.०८/०६/२०२२ व दि.०२/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तरी प्रकरणी तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नसून सदर जागेवर सन २००५ व सद्य:स्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनापासून ५० मी. च्या बाहेर येत असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे योग्य होईल, असे या कार्यालयाचे नम्र मत आहे. तरी अहवाल सविनय सादर.

(भागवत गावंडे)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**

CS CamScanner

(7)

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दुरध्वनी क्र. २८०७५०३४ ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन

क्रमांक :-तह/बोरी/टे-२/कावि-१४८२/२०२२
दिनांक :- ०७/०२/२०२३ 149

प्रति,
मा. उप विभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

09 FEB 2023

विषय :- **मौजे-मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क. १५८३ साई दर्या ढाबाच्या मागे, मार्वे रोड, मालवणी या ठिकाणी कांदळवनाचा -हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत....**
**श्री. योगेश केणी, महाराष्ट्र अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन, मालाड, मुंबई**

संदर्भ :-आपलेकडील पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-८२६/२०२२ दि. १२/०९/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयाकींत प्रकरणी आपलेकडील संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सादर करणेत येते की, आपलेकडील संदर्भिय पत्रासोबत प्राप्त श्री. योगेश केणी, महाराष्ट्र अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन, मालाड, मुंबई यांनी मौजे-मालवणी, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५८३ साई दर्या ढाब्याच्या मागे, मार्वे रोड, मालवणी या ठिकाणी कांदळवनाचा -हास, अवैध बांधकाम व भरणी होत असलेबाबत तक्रार केलेली आहे.

त्याअनुषंगाने सादर करणेत येते की, सदर प्रकरणी यापूर्वीही श्री. पी. जे. जोसेफ व श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन यांनी विषयांकीत मिळकतीबाबत तक्रार दाखल केलेली होती. **तसेच तक्रारदार, श्री. योगेश केणी, महाराष्ट्र अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन, मालाड, मुंबई, श्री. पी. जे. जोसेफ व श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन यांनी केलेल्या तक्रारी ह्या एकाच मिळकतीबाबत असून फक्त तक्रारदार हे वेगवेगळे आहेत.**

तथापि, मौजे-मालवणी, ता. बोरीवली येथील स.नं. २०६, हि. नं. ४ या सरकारी मिळकतीवर श्री. पी. जे. जोसेफ व श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन यांनी यापूर्वीच तक्रार दाखल केली असल्यामुळे यापूर्वीच सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार **श्री. धनेश कोळी** यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२७३/२०२१ दि. २५/०९/२०२१ रोजी भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४४१, ४४७ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२० अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. सोबत F.I.R. ची प्रत जोडत आहे.

तसेच प्रभारी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड सदर जागेवरील अवैध बांधकामाचे निष्कासन करणेबाबत दि. २७/०६/२०२२ रोजी पत्र देण्यात आले आहे (सोबत प्रत). तसेच दि. ०२/०२/२०२३ रोजी स्मरणपत्र देण्यात आलेले आहे (सोबत प्रत). सदरचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

कृपया सदरची तक्रार बंद करावी ही विनंती.

(विनोद धोत्रे)
तहसीलदार बोरीवली

**प्रत :-** मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.

D:\Kandalvan\2022\कावि-1482-मालवणी न.भू.क्र.1583-कांदळवनाची कत्तल केलेबाबत-श्री. योगेश केणी-2022-S.docx

CamScanner

0020812

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

राज्य State महाराष्ट्र : जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station मालवणी, पहिली खबर क्र. FIR No. 1273, वर्ष Year 2021, दिनांक Date 25/09/21

(i) अधिनियम Act भा. द. वि., कलमे Sections 441, 447

(ii) अधिनियम Act म. पो. का., कलमे Sections 120

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

(a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from 12/08/2021, वेळ Time ..... ते तारीख पर्यंत Date to 25/09/2021 वेळ Time दरम्यान

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 25/09/2021 वेळ Time 10:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 19/21, तारीख Date 25/09/21 वेळ Time 11:00 वा.

माहितीचा प्रकार Type of Information : ..........., लेखी / तोंडी Written / Oral तोंडी.

गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. 04.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मौजे - मालवणी, ठिकाणाची नंबर No. if any ..., गल्ली Ward तालुका बोरीवली, रस्त्याचे नाव Name of road सर्वे क्र.

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place 206 गाव Village हि. नं. 06, पोस्ट Post मालवणी, तालुका Taluka मालाड (प), जिल्हा Dist. ..., राज्य State मुंबई.

(c) पोलीस ठाणेचे हदीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री. संतोष ह लोहकरे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बारकु लोहकरे.

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 33 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality ..........., फोन नं. Phone No. 8976712375.

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........., (f) व्यवसाय Occupation ...........

(g) धर्म Religion हिंदु, जात Caste ..........., उपजात Sub-Caste ...........

(h) पत्ता Address : बी 106, गल्ली / वार्ड नं. Ward ..., फ्लॅट नं. 503, घर / नाव नं. House/Name No. ..., 5 वा मजला, फोन / मो. नं. Phone/M. No. ..., पॅन नं. PAN No. ..., आशानगरी, ओळख नं. Card No. ... बसाहत,

रस्त्याचे नाव Road घाटकोपर मानखुर्द, जवळचे परिचित ठिकाण Nearest identifiable place लिंक, गाव Village रोड, पोस्ट Post घाटकोपर (पू.), मुंबई.

तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर पंजन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभिलेखा साथा फाईलला जोडावे)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① धनेश्वरा कोळी.

3200 BI (25...) 15... 2021 ...

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्यास झालेल्या विलंबाची कारण ........ तात्काळ .........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..................................

Total Value of properties stolen / Involved ..................................

(b) चोरीपी मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................................

Unnatural / Accidental Death Case No., if any ..................................

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी कॉलम क्र. ०७ मधील
आरोपीताने मौजे - मालवणी, तालुका बोरीवली, सर्वे क्र. २०६, हि.
नं.१, मालाड(प), मुंबई येथील शासकिय जागेवर अनाधिकृत
पने अतिक्रमन केले म्हणून मालवणी पो.ठाणे. गु.र.क्र. १२७३/२१
कलम. ४४७, ४४८ भा.द.वि. सह. १२० म.पो.का. अन्वये गुन्हा
नोंद.

केलेली कार्यवाही — 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

स.पो.नि. चव्हाण.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................., जिल्हा .................., राज्य ..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank.................. No.................. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

| | |
|---|---|
| तक्रारदाराची सही व अंगठा | पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. |
| Signature and Thumb Impression | Signature of Officer In-charge, Police Station |
| of the Complainant / Informant. | संपूर्ण नाव Name ........ अनुराम दिक्षीत |
| | पदनाम Rank........ पो.उप.निरीक्षक |
| | तपासिक अ. चा कोड क्र. ........ मालवणी पो.ठाणे. |
| | Posting मुंबई. |
| | Code No. of I. O. .................. |

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | |
|---|---|---|---|
| 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

जबाब दि- २५.०९.२०२१

श्री. संतोष बारकु लोहकरे वय ३३ वर्षे, धंदा मंडळ अधिकारी गोरेगाव, तहसीलदार बोरीवली यांचे कार्यालय, डॉ.न.ग. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, बोरीवली पश्चिम मुंबई रा.ठी:- बी / ६, फ्लॅट नंबर ५०३, ५वा माळा, शासकीय वसाहत, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर पूर्व मुंबई ४०००७१, मो. नंबर ८९७६७१२३७५

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी २०१४ पासुन माझे कुटुंबीयासह राहण्यास आहे. मी मंडळ अधिकारी गोरेगांव या पदावर तहसीलदार बोरीवली यांचे कार्यालयात दिनांक ०४/११/२०१६ पासुन कार्यरत आहे. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ अंतर्गत नमुद केलेली कार्य व कर्तव्य प्रामुख्याने महसुल विभागाची महसुल वसुल करणे. शासकिय जागेवरील अतिक्रमन या बाबत चोकशी करून वरिष्ठांना अहवाल सादर करणे, तसेच तलाठी यांच्यावर देखरेख व नियंत्रण अशा प्रकारची कार्य आहेत. महसुल विभागाच्या गोरेगांव मंडळाचे कार्यक्षेत्र गोरेगाव पुर्व पश्चिम, मालाड पश्चिम, एरंगळ, मालवणी, असे असुन या कार्यक्षेत्रामध्ये मी वरीलप्रमाणे कामे करीत आहे.

तलाठी सझा मालवणी यांनी मा. उपजिल्हाधिकारी (अति निष्का) मालाड यांचे कार्यालयातील भूमापक, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयातील इंजिनिअर व प्रतिनिधी यांचे समवेत स्थळपाहणी करून दि 12.09.2021 रोजी सादर केलेल्या अहवालानुसार मौजे-मालवणी, ता. बोरीवली येथील स.नं. २०६, हि.नं. ४ या या शासकीय मिळकतीवर २५ x १० फुट आकाराचे पक्के ७ गाळे / घरे दुमजली स्वरूपात (ग्राऊंड + १) असे अनधिकृत बांधकाम केल्याचे नमूद केले आहे. सदरचे बांधकाम श्री. धनेश कोळी यांने विकासकामार्फत केले आहे. सदर गाळ्यांची उंची २० फुट इतकी आहे.

त्या अनुषंगाने मा.तहसीलदार बोरीवली यांचे कडील पत्र क्रमांक तह / बोरी टे-२/का-वि-432/2021 दिनांक 24/09/2021 रोजीच्या आदेशानुसार या कार्यालयास संबंधीतांवर गुन्हा दाखल करणे कामी प्राधिकृत करण्यात आलेले आहे. प्रकरणी मौजे- मालवणी, तालुका - बोरीवली येथील सर्वे क्रमांक 206,हि.नं-04 या शासकीय मिळकतीवरील अतिक्रमन धारक नामे श्री धनेश कोळी यांनी शासकीय मिळकतीवर अतिक्रमन केल्याने त्याच्या विरूध्द माझी शासनातर्फे कायदेशीर कार्यवाही होण्यास फिर्याद आहे.

माझा वरील जबाब मराठीत लिहला असुन तो मी वाचुन पाहीला असता माझ्या सांगण्या प्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

(अनुराग दिक्षीत)
पोलीस उप निरीक्षक
मालवणी पोलीस ठाणे,मुंबई

(11)

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दुरध्वनी क्र. २८०७५०३४
ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन
स्मरणपत्र-१

क्रमांक :-तह/बोरी/टे-२/कावि-११६३/२०२१
दिनांक :- ०२/०२/२०२३

प्रति,
प्रभारी उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड
पत्ता-एम.एच.बी. इमारत क्र. ३८, पहिला मजला,
सिध्दार्थ नगर, एस. व्ही. रोड, गोरेगांव (प),
मुंबई-४०० ०६२.

विषय :- **मॅग्रोव्हच्या झाडांची कत्तल करुन तसेच त्याठिकाणी भरणी करुन उभारण्यात येणाऱ्या २० खोल्यांची एक मजली अनधिकृत इमारतीवर कारवाई करीत सदर बांधकाम करणाऱ्या मयुर केणी व इतर यांच्यावर गुन्हे दाखल करणेबाबत... श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन**

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-२ आय/ कांदळवन/कावि-३५५/२०२१ दि. १२/०७/२०२१.
२) दि. ०१/१२/२०२१ रोजी तालुकास्तरीय कांदळवनाच्या बैठकीत दिलेले निर्देश.
३) या कार्यालयाचे पत्र क्र. तह/बोरी/टे-२/कावि-११६३/२०२१ दि. ०८/०६/२०२२.

उपरोक्त विषयाकींत प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील संदर्भिय पत्रासोबत प्राप्त श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन यांनी मॅग्रोव्हच्या झाडांची कत्तल करुन तसेच त्याठिकाणी भरणी करुन उभारण्यात येणाऱ्या २० खोल्यांची एक मजली अनधिकृत इमारतीवर कारवाई करीत सदर बांधकाम करणाऱ्या मयुर केणी व इतर यांच्यावर गुन्हे दाखल करणेबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

तथापि, सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार अन्वये **श्री. धनेश कोळी** यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२७३/२०२१ दि. २५/०९/२०२१ रोजी भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४४१, ४४७ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२० अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये उपरोक्त जागेवरील कांदळवनालगत बांधण्यात आलेली अनधिकृत अतिक्रमणे निष्कासनाची कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु प्रकरणी आपण अद्याप कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयास अहवाल सादर करण्यास विलंब होत आहे. तरी प्रकरणी त्वरीत निष्कासनाची कारवाई करण्यात यावी.

(विनोद धोत्रे)
**तहसीलदार बोरीवली**

**प्रत** :- १) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) श्री. विनोद घोलप, अध्यक्ष, फाईट फॉर राईट फाऊंडेशन, पत्ता-१२३, केणी हाऊस, भंडारवाडा, पन्नालाल घोष मार्ग, मालाड (प), मुंबई-४०० ०६४.

D:\Kandalvan\2022\कावि-1482-मालवणी न.भू.क.1583-कांदळवनाची कत्तल केलेबाबत-श्री. योगेश केणी-2022-S.docx

CamScanner